www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १५८ वा शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पाकिस्तानकडून १५४ भारतीयांना व्हिसा मंजूर

## यामागचं कारणही आहे तितकंच खास

भारत आणि पाकिस्तान या दोन शेजारी देशांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून तणावाचे वातावरण आहे. पाकिस्तानात सुरु असलेल्या क्रिकेट स्पर्धेसाठीही भारताने जाण्यास नकार दिल्यामुळे, भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहेत. याशिवाय, राजकीय स्तरावर आणि नियंत्रण रेषेवरही फारसे चांगले वातावण नाही. असे असताना आज पाकिस्तानकडून काही भारतीयांना सुखद धक्का देण्यात आला. पाकिस्तानने शुक्रवारी १५४ भारतीयांना एका खास कारणासाठी व्हिसा मंजूर केल्याची माहिती दिली.

**व्हिसा मंजूर केल्याचे कारण काय?**

श्री कटास राज मंदिराला ( shree katas raj temple ) भेट देण्यासाठी १५४ भारतीयांना व्हिसा मंजूर करण्यात आल्याचे पाकिस्तानने सांगितले आहे. भारतातील पाकिस्तान उच्चायुक्तालयाने शुक्रवारी सोशल साइट X वरून ही माहिती दिली. पाकिस्तान उच्चायोगाने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२५ या कालावधीत श्री कटास राज मंदिरात तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय यात्रेकरुंना व्हिसा देण्याबाबतचे निवेदन चार्ज डी'अफेअर्स साद अहमद वारैच यांनी एक्स वर पोस्ट केले आहे. त्यांनी तीर्थयात्री जाणाऱ्या यात्रेकरूंना शुभेच्छा दिल्या आहेत आणि त्यांचा प्रवास आध्यात्मिकदृष्ट्या आनंददायी होईल, अशी आशाही व्यक्त केली आहे. पाकिस्तानच्या म्हणण्यानुसार,




परस्पर समंजसपणा आणि आंतर-धार्मिक सलोखा वाढविण्याच्या धोरणानुसार अशा भेटी सुलभ करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला आहे आणि या उद्देशासाठी पाकिस्तान वचनबद्ध असल्याचेही म्हटले आहे. निवेदनात म्हटले आहे की, १९७४ च्या पाकिस्तान-भारत प्रोटोकॉलनुसार, दरवर्षी भारतातील हजारो हिंदू आणि शीख यात्रेकरू धार्मिक स्थळांच्या तीर्थयात्रेत विविध प्रसंगी आणि धार्मिक उत्सवांना उपस्थित राहण्यासाठी पाकिस्तानला भेट देतात. श्री कटास राज मंदिर किला कटास या नावाने देखील लोकप्रिय आहे. या मंदिराच्या संकुलात अनेक हिंदू मंदिरे देखील आहेत. या मंदिराचे संकुल कटास नावाच्या तलावाने वेढलेले आहे. हिंदू ते पवित्र मानतात. येथे येण्यासाठी व्हिसा मंजूर करण्यात आले आहेत.

**श्री कटास राज मंदिराचे महत्त्व काय?**

श्री कटास राज मंदिर परिसर पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील पोतोहार पठार प्रदेशात आहे. पुराणांमध्ये असे म्हटले आहे की मंदिराचे तळे महादेवाच्या अश्रूंनी बनलेले आहे. जेव्हा शंकर भगवान त्यांची पत्नी सतीच्या मृत्युनंतर दुःखाने पृथ्वीवर भटकत होते, तेव्हा त्यांच्या डोळ्यातून आलेल्या अश्रूंमुळे हा तलाव तयार झाला. हे तलाव दोन कनाल आणि १५ मरळा क्षेत्रात पसरलेले आहे. त्याची कमाल खोली २० फूट आहे.२००५ मध्ये भारताचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी मंदिरांना भेट दिली होती. २००६ मध्ये, पाकिस्तान सरकारने मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू केले आणि २०१७ मध्ये आणखी सुधारणांची घोषणा केली.

# उरणमधील ७२५ ग्राहकांना विज पुरवठा महावितरणाने ठेवले अंधारात




**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : उरण मधील वाढते औद्योगिकरण सिडकोने नवीन वसवलेल्या वसाहती त्याचप्रमाणे वाढते उद्योग व्यवसाय, त्यामुळे यासाठी लागणारा विज पुरवठा हा भरपूर प्रमाणात होत आहे. त्याचबरोबर विज चोरी,बिल थकबाकी याचेही प्रमाण वाढतच आहे. या गोष्टीचा आढावा घेतल्यास, उरण तालुक्यातील ६७५१ ग्राहकांकडे २०फेब्रुवारी २०२५ पर्यंत असलेल्या तीन कोटी ३९ लाख ९० हजार ५३७ रुपये थकबाकी वसुलीसाठी महावितरणाने या नवीन वर्षात जोरदार मोहीम हाती घेतली आहे.

या मोहिमेअंतर्गत ७२५ ग्राहकांवर तात्पुरता वीज पुरवठा बंद करण्याची कारवाई केल्याची माहिती अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांनी दिली .उरण तालुक्यात दुकान व्यावसायिक,घरगुती आणि सार्वजनिक असे एकूण ६७ हजार ९११ ग्राहक आहेत, पैकी घरगुती ५४९० या ग्राहकांकडे एक कोटी १७ लाख ५०हजार ५२९ रुपये ,औद्योगिक कंपन्या ९० ग्राहकांकडे एक कोटी ६४ लाख २४ हजार ११९रुपये , तर दुकान व्यवसायिकरीता ११७१ ग्राहकांकडे ५८ लाख १५ हजार ८८८ अशी एकूण ६७५१ ग्राहकांकडे महावितरणाचे रुपये थकीत बीले देणे बाकी आहेत. त्यामुळे महावितरणांनी ७२५ विज ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडित केला आहे.

# आभानासे"कुस्ती स्पर्धेत हनुमंत खरात यांना रौप्य पदक प्राप्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : दि. 17-02-2025 ते दि. 20-02-2025 रोजी (बालेवाडी ) पुणे. येथे झालेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा 2024-25 संपन्न झाल्या. यामध्ये अनेक राज्यातील शासकीय खेळाडू कर्मचारी सहभागी झाले होते. महाराष्ट्र शासनाच्या संघातून कर्जत वनविभागातील हनुमंत माधव खरात यांनी भाग घेऊन फ्री स्टईल कुस्ती प्रकारात 125 किलो वजनी गटात रौप्य प्रदक प्राप्त केलेआहे. याबद्दल खरात यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.वनविभागात वनपरिक्षेत्र कर्जत (पुर्व) येथे कार्यरत असलेले




वनकर्मचारी श्री. हनुमंत माधव खरात हे वेटलिफ्टिंग व पॉवरलिफ्टिंग खेळाडूना मार्गदर्शन करीत असतात. तसेच ते सुद्धा वेटलिफ्टिंग आणि पॉवरलिफ्टिंग खेळातील जिल्हा, राज्य स्पर्धेतील पदक विजेते आहेत. हनुमंत कल्पना माधव खरात यांना अलिबाग येथील उपवनसंरक्षक अधिकारी राहुल पाटील साहेब, पनवेलचे सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी सागर माळी साहेब आणि आणि वनपरिक्षेत्रधिकारी कर्जत पूर्व येथील श्री प्रदीप चव्हाण साहेब आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांचे मोलाचे प्रोत्साहन आणि सहकार्य लाभले आहे. आपल्या पदकाचे श्रेय ते अधिकारी वर्ग आणि सहकारी यांना देऊन त्या सर्वांचे आभार मानले आहेत.

# बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी अॅड.महेश बेदरे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत यामध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी पाटोदा येथील पत्रकार अड. महेश बेदरे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती दिनांक 20 फब्रुवारी रोजी जाहीर केली आहे.या मध्ये पाटोदा तालुका अध्यक्षपदी पत्रकार महेश बेदरे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे पत्रकार बेदरे यांच्या निवड जाहीर झाल्यानंतर त्यांचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. या मध्ये युवा नेते सागर आप्पा धस, पाटोदा पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, श्री



क्षेत्र संत मीराबाई संस्थान मठाधिपती महंत राधाताई महाराज आईसाहेब, ज्येष्ठ पत्रकार विलास भोसले, उद्योजक अनिल शेठ वडगावकर, उद्योजक सुदर्शन दाजी चव्हाण नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, सय्यद शहानवाज, पत्रकार हमीद खान पठाण, ज्येष्ठ पत्रकार दयानंद सोनवणे, पत्रकार जावेद शेख, पाटोदा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अमीरभाई शेख, दिव्यांग संघर्ष समितीचे अध्यक्ष जिलानी शेख, ह.भ.प.रत्नाकर धसे, ह.भ.प.लक्ष्मण महाराज सस्ते, गणेश शेवाळे, शेख महेशर, काँग्रेसचे नेते सुनील काळे, सामाजिक कार्यकर्ते स्वामी सानप, आदर्श शिक्षक संदीप जावळे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष डॉक्टर नरेंद्र जावळे, बालाजी जाधव, संदीप जाधव, रामेश्वर गोरे, पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट सीताराम नागरगोजे, माजी नगरसेवक सुशील कोठेकर, पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ एडवोकेट सचिन जावळे, बापू नवले पाटील, पत्रकार सुधीर एकबोटे, राष्ट्रवादीचे नेते श्याम भाऊ हुले, मराठा सेवक सुरेंद्र बाबा तिपटे, ब्राह्मण महासंघाचे प्रशांत देशमुख, श्रीकांत धसे, विनायक पांडव, मयूर नारायणकर, शेख खालेद, एडवोकेट रवींद्र आवटे, यांच्या सह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# भिंगोली येथे शिवनेरीच्या रा से यो चे आज उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**प्रशांत तांबोळकर । शिरूर अनंतपाळ लातूर** : येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तालुक्यातील भिंगोली येथे दिनांक २१ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ' माझ्या भारताचे युवक आणि डिजीटल साक्षरता ' ( Youth for My Bharat &Youth For Digital Literacy ) ' हा उद्देश ठेवून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिराचे उद्घाटन शनिवार दि . २२ फेब्रुवारी रोजी कॉग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळूंके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे .

या रासेयो च्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी संस्था अध्यक्ष प्रतापराव माने हे राहणार असून , यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे रासेयो चे संचालक डॉ . मलिकार्जुन करजगी यांच्यासह संस्थेचे सचिव पद्माकर मोगरगे , कोषाध्यक्ष जयेश माने ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . अरुण धालगडे गावच्या सरपंच सौ . सुशीला चेवले , उपसरपंच अड . ज्ञानेश्वर चेवले , तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी साळुंके , पोलीस पाटील एकनाथ पाटील ,ग्रामपंचायत सदस्य शस्त्र गुण साळुंखे दिलीप बानाटे सौ लता साळुंखे सुजाता साळुंखे सौ अंजना जरीपटके ग्रामपंचायत अधिकारी झेड एन सय्यद शालेय शिक्षण समितीचे भागवत सुळे विविध कार्यकारी सेवा सोसायटी शिवांपाचे संचालक अरविंद चौगुले जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बालाजी भालेराव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे .

या सात दिवशीय शिबिरात अंधश्रद्धा निर्मूलन, बेटी बचाव बेटी पढाव, बाल विवाह प्रतिबंधात्मक रॅली या सह सर्व रोग निदान शिबिर, रक्त तपासणी शिबीर , रक्तदान शिबिर , ग्रामस्वच्छता , मतदान जन जागृती , जलसंवर्धन योग प्रशिक्षण महिला सशक्तीकरण व्यसन मुक्ती जनजागृती डिजीटल साक्षरता पशुचे लसीकरण व तपासणी विधूत बचत बचत गटांच्या महिलांना मार्गदर्शन कृषी विषयक मार्गदर्शन सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम व व्याख्याने या सात दिवसात आयोजीत शिबीरात होणार आहेत . अशी माहिती रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ . पांडुरंग मुट्ठे, प्रा .डॉ अमोल इंगळे यांनी दिली.

# चिरनेर परीक्षा केंद्रात दहावीच्या परीक्षेला प्रारंभ

## संस्थापक पी. पी. खारपाटलांनी गुलाबपुष्प देऊन केले विद्यार्थ्यांचे केले स्वागत

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने ,घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला शुक्रवार दि. 21 फेब्रुवारी2025 पासून सुरुवात झाली असून ,उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी .खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालय व काळुशेठ धाकु खारपाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजित परीक्षा केंद्रावर शुक्रवार दि.21 फेब्रुवारी पासून, दहावीची परीक्षा सुरू झाली असून, ही दहावीची परीक्षा 17 मार्च पर्यंत सुरु राहणार आहे.



मराठी प्रथम भाषा विषयाच्या पेपरपासून परीक्षेला आरंभ झाला. चिरनेर येथील परीक्षा केंद्राचा परीक्षा केंद्र क्रमांक 7516 असा आहे. परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून किशोर भोईर, उपकेंद्र संचालक म्हणून आनंद चिर्लेकर व स्टेशनरी प्रमुख म्हणून जिचंद भगत हे काम पाहत आहेत. या चिरनेर परीक्षा केंद्रातून मराठी माध्यमाचे 202 परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेसाठी बसले आहेत. याच परीक्षा केंद्रातून इंग्रजी माध्यमाचे दहावीचे 39 विद्यार्थी सोमवार दि. 24 फेब्रुवारी 2025 पासून परीक्षेला बसणार आहेत. या चिरनेर परीक्षा केंद्रातून अकरा ब्लॉकमधून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे.

पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पी. पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालक अर्चना ठाकूर, समीर खारपाटील, सागर खारपाटील मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर तसेच अन्य शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. परीक्षा केंद्र संचालक किशोर भोईर व परीक्षा उपकेंद्र संचालक आनंद चिर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक सहकार्य करीत आहेत. परीक्षा केंद्रांवर परीक्षेच्या पहिल्याच दिवशी, अनेक पालक,विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांचा परीक्षा क्रमांक कोणत्या ठिकाणी आहे. हे पाहण्यासाठी त्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. परीक्षेच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेण्यासाठी परीक्षा केंद्र परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राज्यात कॉपी मुक्त अभियान राबविण्यात येत असून ,रायगड जिल्ह्यामध्ये या अभियानांतर्गत दक्षतेने पाहणी केली जात आहे.

# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी प्रशांत साळुंखे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पिंपरी, वार्ताहर** : डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या पिंपरी चिंचवड शहराची कार्यकारिणी (शुक्रवारी) जाहीर करण्यात आली. पिंपरी चिंचवड शहराच्या अध्यक्षपदी प्रशांत साळुंखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ संपादक राजा माने यांच्या मार्गदर्शनाखाली हा नियुक्ती प्रदान सोहळा संपन्न झाला. यावेळी संघटनेचे प्रदेश सचिव महेश कुंगावकर, सरपंच परिषदेचे अध्यक्ष बापूसाहेब जगदाळे, राज्य समन्वयक अमोल पाटील, माजी पुणे जिल्हाध्यक्ष अजिंक्य स्वामी यांच्यासह पिंपरी चिंचवड शहरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सदर शहर कार्यकारणीमध्ये उपाध्यक्षपदी गणेश मोरे, सुवर्णा गवारे, सचिव मंगेश सोनटक्के, खजिनदार संजय गायखे, प्रसिद्धीप्रमुख लीना माने तर सदस्यपदी विकास शिंदे, संजय शिंदे, रवी जगधने, पूनम पाटील, यशोदा नाईकवाडे, सोमनाथ नाडे, स्वयम असवार, निलेश सायकर, सूचित कुलट, हनुमंत तरडे, मनोज जाधव, रवी वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, पुणे जिल्हाध्यक्ष पदी गणेश हुंबे यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांना शुभेच्छा देत संघटना वाढीसाठी आणि संघटनेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरातील डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांसाठी काम करण्याचे व त्यांच्या समस्या मार्गी लावण्याबाबत मार्गदर्शन केले.

# आजचं शिक्षण, उद्याचं भविष्य - आव्हानात्मक पालकत्व

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**

**विनोद गायकवाड** : निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन संचलित 'श्रीराम क्लासेस, निफाड' तर्फे विविध स्तरावरील शालेय स्पर्धा परीक्षा मध्ये घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव, बक्षीस वितरण कार्यक्रम आणि शिक्षक सत्कार सोहळा.शिवनेरी लॉन्स निफाड येथे नुकतेच संपन्न झाला असून या निमित्ताने पालकांच्या संवाद सत्रात परभणी येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी फाउंडेशनचे विद्यार्थीमित्र प्रा. रफीक शेख (करिअर मार्गदर्शक) यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन मुलांना व पालकांना लाभले, त्यांनी उपस्थित पालकांचं प्रबोधन केले.



## "पालकांनी मुलांच्या पावलांसमोर प्रकाश ठेवावा, सावल्या नाही . प्रा . रफीक शेख

या कार्यक्रमात "आई-बाबा, मला शिकायचंय" या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य .वि. दा .व्यवहारे -विश्वस्त न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आले या पुस्तकाचे संपादन श्रीराम क्लासेस चे संचालक .उल्हास पाटील व.सविता पाटील यांनी केले.असून पुस्तक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे , विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देणारे आहे.या प्रसंगी विद्यार्थी मित्र प्रा. रफीक शेख.आपल्या मनोगतात म्हणाले की शिक्षण ही कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक शिक्षणाच्या चौकटी मोडून नवनवीन शिक्षणपद्धती उदयास येत आहेत. अशा परिस्थितीत पालकांची भूमिका केवळ मार्गदर्शकाची न राहता ती अधिक आव्हानात्मक बनली आहे.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही. मुलांना तांत्रिक कौशल्ये, संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि जीवन कौशल्ये शिकवणे तितकेच महत्त्वाचे बनले आहे. त्यामुळे पालकत्व अधिक जबाबदारीचे आणि आव्हानात्मक ठरत आहे.

पूर्वी शिक्षण म्हणजे शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रम, परीक्षा आणि पदवी मिळवणे असे गणले जात असे. मात्र, आता शिक्षण बहुपर्यायी झाले आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन कोर्सेस, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आणि व्यवसायिक कौशल्यांचे महत्त्व वाढले आहे. भविष्यातील नोकऱ्या आणि संधींसाठी पारंपरिक शिक्षण पुरेसे ठरणार नाही.आजच्या शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये उद्याच्या भविष्याची हमी देऊ शकतात. म्हणूनच, पालकांनी केवळ शैक्षणिक यशावर भर न देता मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिल्यासच त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.असे मोलाचे मार्गदर्शन केले

शिक्षण हा केवळ ज्ञान मिळवण्याचा मार्ग नाही, तर जीवनाचा पाया मजबूत करण्याचा मार्ग आहे. यशस्वी पालकत्व हे केवळ मुलांना चांगल्या शाळेत घालण्यापुरते मर्यादित नसून, त्यांना विचारशील, संवेदनशील आणि सक्षम व्यक्ती बनवण्याची जबाबदारी पालकांची आहे. मुलांचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर आजच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे,कारण सुशिक्षित पिढी म्हणजे प्रगत समाजाची खरी ताकद आहे असं त्यांनी शेवटी स्पष्ट केलं.

ह्या कार्यक्रमात निफाड नगर पंचायत च्या नगराध्यक्षा डॉ कविता धारराव नगराध्यक्षा , उप नगराध्यक्ष अनिल पा. कुंदे - , , वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ निकम ,वि.दा.व्यवहारे कार्यकारी विश्वस्त, तात्यासाहेब वडघुले सचिव , जेउघाले , ज्योती बागडे मुख्याध्यापिका ,प्रसन्ना कुलकर्णी मुख्याध्यापक, दिगंबर पाटील अध्यक्ष - निफाड एज्युकेशन तसेच निफाड एज्युकेशन फाउंडेशन चे सर्व कार्यकारी सदस्य , पत्रकार-राजेंद्रजी थोरात ,मंगेश देवडे (जलसंधारण अधिकारी- नाशिक) , फैजल पटेल -दीप एज्युकेशन यांच्या सहआदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचं नियोजन आणि आयोजन श्रीराम क्लासेसच्या वतीने करण्यात आलं होतं.

# तरुणांनी नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक बनावे - आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

- प्रचंड कष्टाची तयारी, दुर्दम्य उत्साह आणि प्रखर सकारात्मक वृत्ती असल्याशिवाय उद्योजक घडत नाहीत - आमदार बबनराव लोणीकर
- नव उद्योजक निर्माण व्हावेत यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी मदत करणार - आमदार लोणीकर

दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी.नामदेव.मंडपे । मंठा जालना** : आजच्या युगामध्ये अनेक जण नोकरीच्या मागे धावत असून नोकरी हेच आजच्या अनेक तरुणांचे अंतिम ध्येय बनले आहे. नोकरी हे अंतिम ध्येय न ठेवता आपण उद्योजक बनले पाहिजे. लघु, सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म व्यावसायिकांसाठी सरकारी योजना, बँक कर्जसुविधा यांची मुबलक उपलब्धता आहे. पुण्यासारख्या शहरात हे व्यावसायिक या सोयी-सवलतींबद्दल जागृत आहेत. परंतु ते या सुविधांचा लाभ घेण्यासाठी उत्सुक नसतात. त्यामुळे नव तरुणांनी नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक बनावे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.जालना येथे हॉटेल सागर इन येथे संपन्न झालेल्या एम.एस.एम.ई. व भीम उद्योग अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना आ.लोणीकर पुढे म्हणाले की, कोणताही उद्योग व्यवसाय उभारायचा म्हटला की तीव्र इच्छाशक्ती असावी लागते पण फक्त तीव्र इच्छा असून चालत नाही. तुम्ही राबवत असलेल्या संकल्पनेला बाजारपेठही असावी लागते, आणि ही बाजारपेठ सातत्याने वाढती असावी लागते. या बाजारपेठेला काबीज करण्यासाठी शिस्त, सातत्य, चिकाटी आणि उत्तम व्यवस्थापन असावे लागते. प्रत्येकाला आपला उद्योग मोठा व्हावा असे वाटत असते. पण तो मोठा करण्यासाठी नेमके काय करावे याची जाणीव नसते त्यामुळे प्रयोग करण्यातच



एम.एस.एम.ई. व भीम उद्योग अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते उद्घाटन

खूप वेळ जातो. जगातील मोठ्या उद्योगांचा अभ्यास केला तर लक्षात येईल की या उद्योगांनी आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.यशस्वी उद्योजक होण्यासाठी त्याकरिता लागणारी सर्जनशीलता उद्योजकाकडे असावी लागते. पुरेसे भांडवल अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणि कुशल मनुष्यबळ यांच्या जोरावर उत्पादकता वाढ साधायला हवी. व्यवसायसंस्थेतील कामांचा क्रम व वेळापत्रक ठरवून, वेळेचं सुयोग्य व्यवस्थापन करावे लागते. सर्वात महत्वाचे म्हणजे बाजारपेठेचा अभ्यास करून, संभाव्य विक्रीचा अंदाज बांधून आणि विपणन संशोधन करून, प्रभावी मार्केटिंग करावे लागते. ग्राहकांचे मानस शास्त्र समजावून घेऊन, परिणामकारक जाहिरात व विक्रय वृद्धी योजना राबवाव्या लागतात. आजुबाजूच्या पर्यावरणात घडणारे बदल लक्षात घेऊन सतत अचूक आणि वेळेत निर्णय घ्यावे लागतात. संवाद कौशल्य आणि वाटाघाटींचे कौशल्य आत्मसात करावे लागते. आणि सर्वात शेवटी प्रचंड कष्टाची तयारी, दुर्दम्य उत्साह आणि प्रखर सकारात्मक वृत्ती असावी लागते. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.नवीन उद्योजक निर्माण होण्यासाठी त्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे गरजेचे असून आर्थिक तरतूद नसल्यामुळे अनेक उद्योजक उद्योगाची उभारणी करू शकत नाहीत बँकेचे पाठबळ असणे अत्यंत आवश्यक आहे अशावेळी शासन स्तरावर मोठे प्रयत्न होणे गरजेचे असून भीम उद्योग अभियान मार्फत ज्या उद्योजकांना नवीन उद्योगाचे विचार आणि करण्यासाठी प्रयत्न केले जातील त्या सर्व उद्योजकांच्या पाठीशी आपण काम करून उभे राहणार असून शासन स्तरावर त्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी कायम असा शब्द यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. यावेळी भीम उद्योग अभियानाचे अध्यक्ष संजय भालेराव, राजेश राऊत, एम.एस.एम.ई. चे राहुल मिश्रा, नरेंद्र इस्टोलकर, मिलिंद काळे, मनोजकुमार शर्मा, शहादेव सातपुते, संतोष काळे, प्रकाश इनकर यांच्यासह अनेक नव उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दखल

## दिव्यांगांच्या आत्मसन्मानासाठी मधु तारा प्रत्येकांसाठी

दैनिक युवक आधार

**पनवेल वार्ताहर** : दिनांक.21 फेब्रुवारी 2025 रोजी पुण्यातील 100 टक्के अस्थिव्यंग दिव्यांग असणारे श्री सलीमभाई शेख यांना व्यवसायासाठी मधु ताराच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक वजन काटा अवघ्या एक दिवसात मोफत भेट देण्यात आला.दिनांक 20 फेब्रुवारी 2025 रोजी सलीमभाई यांनी मधु तारा प्रमुखांना फोन करून व्यवसायासाठी वजन काट्याची मागणी केली होती.त्या अनुषंगाने मधु तारा प्रमुखांनी पुण्यातील मंडई परिसरातील उद्योजक मधु तारा स्नेही रोज मधु ताराचे व्हॉटसअप स्टेटस पाहणारे व यांना माहिती दिली. क्षणाचाही विलंब न करता या



महान व्यक्तीनी आज दिनांक 20 फेब्रुवारी रोजी ही माणुसकीची जिवाला जीव देण्याची सामाजिक बांधिलकी जपत आपण ही समाजाचे देणे लागतो या भावनेतून नाव गुपीत ठेवावे म्हणून मदत केली.या माध्यमातून पुण्यातील जैन स्कील यांचे ऋषभ सर यांनी स्वतः येऊन पुण्यातील वानवडी परिसरात मशीदिसमोर ही भेट वस्तू आणून श्री सलिमभाई शेख यांना सुपूर्त केली व एक वर्षाची वॉरंटी सुद्धा दिली.खरच समाजामध्ये अशा सामाजिक जाणिवेच्या भावनेतून जगणाऱ्या देवरूपी माणसांकडून मधु ताराला मदत मिळते व ती मदत गोरगरीब अपंग दिव्यांगाना केली जाते या साठी मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी या देवरूपी व्यक्तीचे मधु तारा स्नेहिचे मनापासून आभार व्यक्त केले.

## श्री.छत्रपती हायस्कूल भवानीनगर या केंद्रावर दहावीच्या विध्यार्थीचे पुष्पगुछ देऊन स्वागत



दैनिक युवक आधार

**सणसर । विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील शुक्रवार दिनांक 21/2/2025 रोजी भवानीनगर येथील श्री छत्रपती हायस्कूल व जुनियर कॉलेज या केंद्रावर इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा अतिशय सुरक्षित व आनंदी वातावरणामध्ये सुरू करण्यात आली.सर्व परीक्षार्थी विद्यार्थी विद्यार्थिनींचे केंद्राचे केंद्र संचालक श्री सर्जे एस डी सर, उपकेंद्र संचालक श्री गिरी गोसावी सर, कु.माया चव्हाण मॅडम, बैठे पथकातील तांबोळी मॅडम, प्रवीण थोरात सर,यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यावेळी परीक्षा विभागातील श्री.भोसले डी.आर.सर,श्री.सुरेश खटके सर,श्री कालगावकर सर, तसेच रनर म्हणून श्री. गोवेकर सर, श्री. भोसले एस.पी. सर,विजय चव्हाण सर,सुमेध निंबाळकर आणि सर्व सुपरवायझर आणि शिक्षकेतर कर्मचारी यशवंत चव्हाण,शामराव गायकवाड,दादा साळुंके उपस्थित होते.त्यावेळी केंद्र उपसंचालक श्री गिरी गोसावी सर आणि कु.माया चव्हाण मॅडम यांनी परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या.त्यावेळेस श्री छत्रपति मुलांचे हायस्कूल भवानीनगर च्या पर्यवेक्षिका कु.गोरे मॅडम उपस्थित होत्या.या केंद्रावरती एकूण 544 परीक्षार्थी परीक्षेसाठी बसले असून.सर्व परीक्षार्थींना आनंदी व निर्भीड वातावरणात परीक्षा देता यावी म्हणून सर्व परीक्षार्थींना योग्य त्या सूचना देण्यात आल्या.आणि परीक्षा आनंदी वातावरणामध्ये सुरू झाली.

## राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५ उद्घाटन सोहळा खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण



दैनिक युवक आधार

**नांदेड प्रतिनिधी । चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर । नांदेड** -: श्री गुरु गोविंद सिंघ जी स्टेडियम नांदेड येथे राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन समारंभ नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले. नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला राज्यभरातून आलेल्या सर्व महसूलचे कर्मचारी, अधिकारी व खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी मुख्यमंत्री श्री.अशोकरावजी चव्हाण साहेब,राजेश कुमार साहेब अप्पर मुख्य सचिव मंत्रालय मुंबई,आमदार.प्रताबरावजी पाटील चिखलीकर साहेब, श्री. दिलीप गावडे साहेब विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, डॉ.अजित गोपछडे राज्यसभा सदस्य, आमदार श्री.बालाजीराव कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजयाताई चव्हाण,मा.अभिजित राऊत साहेब सहआयुक्त GST छत्रपती संभाजीनगर, मा.अरुण डोंगरे साहेब, नांदेडचे जिल्हाधिकारी मा. श्री. राहुल कर्डीले साहेब, मा. श्री.अबीनाश कुमार साहेब पोलिस अधिक्षक नांदेड श्रीमती मिनल करणवाल मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. नांदेड डॉ. महेश डोईफोडे साहेब आयुक्त नांदेड म.न. पा. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, महसूलचे कर्मचारी आयोजक पत्रकार, मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनीतर्फे शिवजयंती उत्सव 2025 उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार

**पनवेल, (वार्ताहर)** : सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी आयोजित शिवजयंती उत्सव 2025 मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. पाच दिवस चाललेल्या या उत्सवात विविध सामाजिक, सांस्कृतिक व कला उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.उत्सवाची सुरुवात महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाने झाली. या समारंभात व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल, खारघरच्या डॉ. नैना पटेल यांनी महिलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात वाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सेवा दिली. त्याचबरोबर कच्छ युवक संघ, पनवेल यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये 68 रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक योगदान दिले. सायंकाळी महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपणारा पोवाडा व मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. रायगड भूषण शिवभूषण वैभव घरत यांनी आपल्या दमदार आवाजात पोवाडे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्याचवेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाला भेट दिली. सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार मंडळातर्फे करण्यात आला. मुलांच्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या



स्पर्धेत खांदा कॉलनीतील 150 हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपल्या कलेच्या माध्यमातून इतिहास जिवंत केला. त्यानंतर, भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत खांदा कॉलनीसह पनवेल परिसरातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या भाषणातून शिवकालीन शौर्य जागृत केले. खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ढाकणे मॅडम व माजी सैनिक प्रदीप डावकर यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पूजा करण्यात आली. यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक बबन पाटील यांनी सायबर सुरक्षा या विषयावर उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. सकाळी 11 वाजता श्रीहरी भजन मंडळ, खांदा कॉलनी यांनी भक्तीमय भजन सेवा दिली, तर सायंकाळी चार वाजता श्री जनाई महिला भजन मंडळाने हरिपाठ सेवा सादर केली. सायंकाळी सहा वाजता भव्य दिव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. मावळचा सुप्रसिद्ध श्री भैरवनाथ मित्र मंडळाच्या ढोल-ताशा पथकाने मिरवणुकीला उत्साह दिला. त्याचबरोबर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाचे लेझीम पथक विशेष आकर्षण ठरले. पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने नागरिकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. रात्री 9 वाजता चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मंडळाचे सल्लागार उद्योजक श्री ओंकार गावडे यांनी उपस्थित नागरिकांना व महिलांना सकल मराठा समाज मंडळाचे सदस्यत्व स्वीकारण्याचे आवाहन केले. मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव यांनी मंडळाच्या सुरू असलेल्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली. शेवटी सचिव सदानंद शिर्के यांनी शिवजयंती उत्सव 2025 साठी योगदान दिलेल्या सर्व बांधवांचे, देणगीदारांचे व प्रशासनाचे आभार मानून उत्सवाची सांगता केली.

## दादर - रत्नागिरी पॅसेंजर दादर वरून पुन्हा सुरू करण्यासाठी दादर दिवा मार्गाचे तीन दिवसात पाहणी रेल्वे प्रशासन



### कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

दैनिक युवक आधार

**अमित जाधव । मुंबई वार्ताहर दादर** – रत्नागिरी पॅसेंजर पूर्वीप्रमाणे दादर येथूनच सोडावी तसेच दादर – सावंतवाडी पॅसेंजर ट्रेन सुरू करण्याच्या या मागण्यांसाठी शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत (उबाठा), रत्नागिरी सिंधुदुर्गचे माजी खासदार विनायक राऊत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज गुरुवारी पुन्हा एकदा मध्य रेल्वेच्या महाप्रबंधक कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांना दादर - रत्नागिरी पॅसेंजर दादर वरून पुन्हा सुरू करण्यासाठी दादर दिवा मार्गाचे तीन दिवसात पाहणी करण्याचे आश्वासन देण्यात आले.यापूर्वी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मध्य रेल्वेच्या प्रशासनाने संपूर्ण नकारघंटा वाजवलेली होती. परंतु आजच्या बैठकीमध्ये रेल्वे कामगार सेनेचे श्री. संजय जोशी, श्री बाबी देव यांनी दादर वरून गाडी कशी सोडता येईल आणि या गाडीमुळे इतर गाड्यांवर कोणताही परिणाम होणार नाही, हे अभ्यासाअंती मध्य रेल्वेचे महाप्रबंधक श्री. मीना व उपस्थित सर्व अधिकारी यांच्यासमोर मांडले. शेवटी श्री. मीना यांनी श्री. संजय जोशी आणि श्री. बाबी देव यांनी सुचविलेल्या पर्यायाबाबत त्यांच्याबरोबर दादर ते दिवा पर्यंतच्या मार्गाची पाहणी येत्या तीन दिवसात करावी आणि अहवाल सादर करावा, असे आदेश दिले. शिष्टमंडळामध्ये खासदार शिवसेना नेते श्री अरविंद सावंत, शिवसेना नेते माजी खासदार श्री. विनायक राऊत, श्री अरुणभाई दुधवडकर, आमदार श्री महेश सावंत, श्री. संतोष शिंदे, श्री. बाबी देव, श्री. संजय जोशी तसेच कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

===================

## तळा केंद्रावर 10 वी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात सुरू

दैनिक युवक आधार

**तळा वार्ताहर** : गो म वेदक विद्यामंदिर तळा, केंद्र क्रमांक ७८६१ फेब्रुवारी – मार्च २०२५ ची बोर्ड परीक्षा पोलीस बंदोबस्त व बैठे पथकांच्या उपस्थितीत शांतता, कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा'कडून घेण्यात येणारी दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी शुक्रवारपासून सुरू झाली आहे. राज्यात १० वी च्या परीक्षेसाठी १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यंदाही परीक्षेसाठी १० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या दोन हजारांनी वाढली आहे. राज्य मंडळाने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. 'परीक्षेसाठी २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांतून १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थ्यांनी



नोंदणी केली आहे.

परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तळा केंद्रावर मराठी माध्यम २०५, इंग्रजी माध्यम १७ व उर्दू माध्यमाचे १९ असे एकूण २४१ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. तळा केंद्रावरील परीक्षा शांतता, कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पडत आहे. तळा केंद्रावर केंद्र संचालक म्हणून श्री दिलीप ढाकणे, केंद्र उपसंचालक श्री नागनाथ सुर्वे, स्टेशनरी सुपरवायझर श्री प्रसाद सुतार, लिपिक श्री सातांबेकर के के, शिपाई श्री काणेकर एच आर, श्री जाधव पी एस हे काम पाहत आहेत. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, केंद्र संचालक श्री दिलीप ढाकणे, केंद्र उपसंचालक श्री नागनाथ सुर्वे, पिटसई हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संतोष रेड्डीज, पढवण हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री बळीराम चव्हाण आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तळा केंद्रावर गो म वेदक विद्यामंदिर तळा, मांदाड हायस्कूल, पिटसई हायस्कूल, उर्दू हायस्कूल तळा, पढवण हायस्कूल, बोरघर हायस्कूल, उसर हायस्कूल, निकम हायस्कूल तळा व पन्हेळी हायस्कूलचे विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.



दैनिक युवक आधार

मा प्रवीण(पप्पू )शिंदे यांची आंबेगाव तालुका राज्य मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष पदी नुकतीच निवड झाली असतांनाच अजून एक आनंदाची बातमी अशी की त्यांची आखिल भारतीय माथाडी कामगार युनियन च्या राज्य सचिव पदी निवड करण्यात आली आहें प्रवीण दादा शिंदे यांच्या कार्याची दखल घेऊन युनियमचे अध्यक्ष आमदार भाई जगताप व सरचिटणीस मा दिलीप जी जगताप साहेब यांनी शिंदे यांना निवडीचे पत्र बहाल केले, या मुळे प्रवीण दादा शिंदे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहें

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## मंदिरांमध्ये गौशाळा अनिवार्य करण्याची गरज – गाई आणि संस्कृतीचे संरक्षण

भारतीय संस्कृतीत गाईला विशेष महत्त्व आहे. गाईला केवळ उपयुक्त पशू म्हणून नव्हे, तर गौमाता म्हणून पूजले जाते. हिंदू धर्मग्रंथांमध्ये गाईचे पालन-पोषण, तिचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व स्पष्टपणे मांडले आहे. मात्र, आधुनिक जीवनशैली आणि शहरांतील बदलत्या परिस्थितीमुळे अनेक गायी बेवारस अवस्थेत फिरताना दिसतात. त्यांची योग्य निगा राखली जात नाही.अशा परिस्थितीत, प्रत्येक मंदिरात एक गाय असावी आणि प्रत्येक मोठ्या मंदिरात एक गौशाळा असावी, यासाठी धोरणात्मक पद्धतीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. मंदिराच्या चढावातून या गौशाळांचा खर्च



भागवला गेला, तर गाईंचे रक्षण तर होईलच, पण भारतीय संस्कृतीही टिकून राहील.

**गौसंवर्धनासाठी मंदिरांची भूमिका महत्त्वाची**

मंदिर केवळ उपासनेचे स्थान नसून, समाजाच्या सर्वांगीण विकासातही महत्त्वाची भूमिका बजावते. जर प्रत्येक मंदिराने एक गाय दत्तक घेतली आणि मोठ्या मंदिरांनी गौशाळा स्थापन केली, तर अनेक बेवारस गायींना योग्य निवारा मिळू शकतो.भारतामध्ये अनेक मोठ्या मंदिरांमध्ये आधीच गौशाळा कार्यरत आहेत. उदा. श्रीरामनाथ गोशाळा (उज्जैन), कांची कामकोटी पीठाची गोशाळा (तामिळनाडू), इस्कॉन मंदिराची गोशाळा ही यशस्वी उदाहरणे आहेत. जर देशभरातील मंदिरांनी याच धर्तीवर कार्य केले, तर गायींचे संरक्षण आणि संगोपन सहज शक्य होईल.

**गायींचे धार्मिक, पर्यावरणीय आणि आर्थिक महत्त्व**

गायीचे रक्षण केवळ धार्मिक कारणांसाठी नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक दृष्टिकोनातूनही आवश्यक आहे.

**धार्मिक महत्त्व** – हिंदू धर्मात गाईला पवित्र मानले गेले आहे. गाईच्या सेवा आणि पूजेने सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक समाधान मिळते, असे मानले जाते.

**पर्यावरणीय महत्त्व** – गाईचे शेण व मूत्र नैसर्गिक खत आणि कीटकनाशक म्हणून उपयोगी पडते. जैविक शेतीसाठी गायींचे संगोपन महत्त्वाचे ठरते.

**आर्थिक महत्त्व** – गायीच्या दुधाचा उपयोग पोषणासाठी होतो, तसेच शेण आणि मूत्राचा उपयोग औषधनिर्मितीसाठी केला जातो. अनेक ठिकाणी पंचगव्य उत्पादने विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जातात.

जर मंदिरांच्या माध्यमातून गायींचे संगोपन झाले, तर संस्कृती आणि पर्यावरणाचे रक्षणही शक्य होईल.

**समाजातील सहभाग अनिवार्य**

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केवळ मंदिर प्रशासन नव्हे, तर संपूर्ण समाजाने पुढाकार घ्यावा.**भाविकांनी योगदान द्यावे** – भक्तांनी मंदिरात चढावा अर्पण करताना त्यातील काही भाग गौसंवर्धनासाठी देण्याची संकल्पना अमलात आणावी.

**स्वयंसेवी संस्थांचा सहभाग** – गायींच्या संगोपनासाठी स्वयंसेवी संस्था, मंदिर प्रशासन आणि भाविक यांच्यात समन्वय साधणे गरजेचे आहे.

**प्रशासनाची मदत आवश्यक** – स्थानिक प्रशासनाने देखील मंदिरांमध्ये गौशाळा सुरू करण्यासाठी मदत करावी, तसेच सरकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून द्यावा जर प्रत्येक मंदिराने एक गाय दत्तक घेतली आणि मोठ्या मंदिरांनी गौशाळा उभारली, तर गायींचे आणि आपल्या संस्कृतीचे संरक्षण होईल. ही संकल्पना अमलात आणण्यासाठी समाजाने जागरूक होणे आवश्यक आहे. ही केवळ धार्मिक बाब नसून पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाजाच्या समृद्धीसाठीही गरजेची आहे.म्हणूनच, आपण सर्वांनी मिळून या संकल्पनेला बळ द्यावे आणि आपल्या संस्कृतीचा अमूल्य वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवावा.

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

## वयाच्या ७४व्या वर्षी यूट्यूब स्टार बनलेल्या 'आपली आजी' सुमन धामणे यांचा प्रेरणादायी प्रवास

अहिल्यानगरच्या ७४ वर्षीय सुमन धामणे यांना यूट्यूब किंवा इंटरनेटबद्दल काहीही माहिती नव्हती. मात्र, त्यांच्या १७ वर्षीय नातू यश पाठक याने त्यांच्यातील असामान्य पाककला कौशल्य ओळखले आणि त्यांना यूट्यूबवर आणण्याचा निर्णय घेतला.

**अशी झाली सुरुवात**

एके दिवशी, यशने सुमन आजींना पाव भाजी बनवण्यास सांगितले. त्यांचा पदार्थ इतका उत्तम झाला की यशने तो व्हिडिओ स्वरूपात रेकॉर्ड करून यूट्यूबवर टाकण्याचा निर्णय घेतला. नोव्हेंबर २०१९ मध्ये "आपली आजी" नावाने चॅनेल सुरू करण्यात आले. पुढच्याच महिन्यात त्यांनी कारल्याची भाजी (करेले की सब्जी) या रेसिपीचा व्हिडिओ पोस्ट केला, आणि काही दिवसांत तो १० लाखांहून अधिक वेळा पाहिला गेला!

**यशाचा प्रवास**

आज "आपली आजी" या चॅनेलला १.७६ दशलक्ष (मिलियन) सबस्क्रायबर्स आहेत. या यशामागे सुमन आजींची उत्कृष्ट पाककला आणि यशचा तांत्रिक कौशल्य आहे. सुरुवातीला कॅमेऱ्यासमोर लाजणाऱ्या सुमन आजींनी हळूहळू आत्मविश्वास मिळवला आणि इंग्रजी शब्दही व्यवस्थित उच्चारायला शिकल्या

**महिन्याला ५ ते ६ लाख रुपयांची कमाई**


आज आपली आजी चॅनेलद्वारे सुमन आजी दरमहा ५ ते ६ लाख रुपये कमावतात. त्यांनी ८०० हून अधिक रेसिपी व्हिडिओ तयार केले आहेत.

**मोठा अडथळा आणि विजय**

ऑक्टोबर २०२० मध्ये त्यांच्या चॅनेलला हॅकिंगचा मोठा फटका बसला. पण यशच्या अथक प्रयत्नांमुळे आणि यूट्यूबच्या मदतीने अवघ्या चार दिवसांत चॅनेल परत मिळवण्यात ते यशस्वी झाले.

**मसाल्यांचे ब्रँडेड उत्पादनही सुरू**

पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थांच्या रेसिपींव्यतिरिक्त, आपली आजी आता ब्रँडेड




मसाल्यांची विक्री देखील करते.

**नवउद्योजकांसाठी संदेश – सातत्य आणि मेहनतच यशाची गुरुकिल्ली!**

सुमन आजींच्या यशस्वी प्रवासाने हे स्पष्ट होते की यश मिळवण्यासाठी वय, शिक्षण किंवा परिस्थिती कधीही अडथळा ठरत नाही. केवळ सातत्याने नवीन संधी शोधत राहणे आणि कठोर मेहनत करणे हेच यशस्वी होण्याचे रहस्य आहे.

नवउद्योजक युवक बंधू-भगिनींनो, नवनवीन संधी शोधा, सतत प्रगती करा आणि कोणत्याही परिस्थितीत मागे हटू नका! सातत्याने पुढे जात राहिलात तर तुम्हीही शून्यातून विश्व निर्माण करून एक यशस्वी उद्योजक होऊ शकता.

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा आवृत्ती)**

## नैतिकतेच्या आधारे राजीनामा दिला पाहिजे – 420 कलमांतर्गत दोषी ठरलेल्या कृषी मंत्र्यांवर जनतेचा रोष

**मुंबई** – महाराष्ट्राचे सध्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या 420 कलमांतर्गत दोषी ठरवत दोन वर्षांची शिक्षा आणि आर्थिक दंड ठोठावला आहे. नैतिकतेच्या दृष्टीने पाहता, फसवणुकीसारख्या गंभीर गुन्ह्यात दोषी ठरलेला मंत्री सत्तेच्या खुर्चीवर राहणे योग्य आहे का? असा सवाल आता जनतेतून आणि विरोधी पक्षांकडून विचारला जात आहे.

**दोषींनाच न्यायालय शिक्षा सुनावते!**

कोणताही न्यायालयीन निकाल हा सबळ पुराव्यांवर आणि कायद्याच्या चौकटीत राहून दिला जातो. न्यायालयाने जर माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवत शिक्षा सुनावली असेल, तर यातून स्पष्ट होते की ते दोषी आहेत. त्यामुळे त्यांच्या मंत्रिपदावर राहण्याचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार टिकतो का? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.

**सरकारलाच 420 बनवणारे मंत्री?**

420 कलम फसवणुकीचा गंभीर गुन्हा दर्शवतो. असे असताना, कोकाटे हे मंत्रिपदावर राहतात, यामुळे सरकारच्या नैतिकतेवर आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी कार्यरत असलेल्या कृषी मंत्र्यांवरच फसवणुकीचा डाग लागल्याने जनतेच्या रोषाला तोंड फुटले आहे.

**राजीनामा का नाही?**

देशभरातील अनेक नेत्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र, माणिकराव कोकाटे अद्यापही पदावर चिकटून राहण्याचा निर्णय घेतल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री आणि संबंधित पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी देखील होत आहे.

**जनतेचा संताप आणि सरकारची परीक्षा**

एका बाजूला भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीला आळा घालण्याची भाषा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला सरकारमधील मंत्रीच 420 कलमांतर्गत दोषी ठरूनही सत्तेवर कायम राहतात, हे लोकशाहीसाठी अपमानास्पद आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आणि सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा आणि माणिकराव कोकाटे यांनी नैतिकतेच्या आधारे तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

**राजकीय आणि कायदेशीर परिणाम**

**कोकाटे यांचा मंत्रिपदावर राहण्याचा कायदेशीर अधिकार आहे का?**
**420 कलमांतर्गत शिक्षा झाल्याने त्यांना आगामी निवडणुकांमध्ये अपात्र ठरवले जाण्याची शक्यता आहे का?**
**विरोधी पक्षांनी यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे का?**

माणिकराव कोकाटे यांचा पुढील निर्णय आणि सरकारची भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

## श्री सद्गुरु पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे फेडी साठी दिलेला धनादेश वटला नाही म्हणून कर्जदार संदीप अर्जुन म्हस्के यास दोन महिने शिक्षा व सात लाख पन्नास हजार रुपए दंड

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी** : अहमदनगर येथील श्री सद्गुरु ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेकडून कर्जदार संदीप अर्जुन म्हस्के याने वाहन खरेदी साठी कर्ज घेतले होते. थकीत कर्ज फेडी साठी त्याने पतसंस्थेस धनादेश दिला होता. सदर धनादेश पतसंस्थेने त्यांचे खात्यात वटविण्यासाठी भरला असता तो चेक वटला नाही व पतसंस्थेस कर्जाचे पैसे मिळाले नाहीत. म्हणून पतसंस्थेने अहमदनगर येथील चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स अक्ट चे कलम 138 प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर केस ची पुढील सुनावणी 3 रे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री एल एस पडेन साहेब यांचे समोर झाली. फिर्यादी पतसंस्थेकडून व्यवस्थापक सुरेश विठ्ठल कुलकर्णी यांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच अवश्यक तो कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला. फिर्यादिची गुणदोषावर सुनावणी होऊन आरोपी संदीप अर्जुन म्हस्के यास दोषी धरून त्याला न्यायाधीश श्री पढेन साहेब यांनी परक्राम्य संलेख अधिनियम 1881 चे कलम 138 मध्ये दोषी धरून दोन महिन्याची साधी कैद व रुपये सात लाख पन्नास हजार दंड अशी शिक्षा दिली आहे. तसेच दंड न भरल्यास एक महिना साधी कैद देण्यात आली आहे. आरोपीने दंडाची रक्कम कलम फिर्यादीस एक महिन्याच्या आत द्यावेत असा आदेश करण्यात आला आहे. फिर्यादी पतसंस्थे कडून व्यवस्थापक सुरेश विठ्ठल कुलकर्णी यांची साक्ष ग्राह्य धरण्यात आली. संस्थेकडून अड शिवाजी अण्णा कराळे , अड करुणा रामदास शिंदे व अड सत्यजीत शिवाजी कराळे यांनी कामकाज पाहिले.

## देशात पहिल्यांदाच शिवजयंतीत महात्मा फुलेंना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठया उत्साहात आणि जल्लोषात साजरी झाली. यावर्षी शिवजयंतीचे वेगळेपण म्हणजे शेकडो वर्षांत देशात पहिल्यांदाच महाराष्ट्रच नव्हेतर देशात अनेक ठिकाणी तसेच परदेशातही शिवजयंतीत छत्रपती शिवाजी महाराजांसोबत शिवजयंतीचे जनक - प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भिडेवाडाकार फुलेप्रेमी विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून साकारलेले देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियानांतर्गत घराघरात शिवजयंती मनामनात शिवजयंती हे अभियान देशभरात राबवण्यात आले. महाराष्ट्रातील पुणे,सातारा, सांगली,सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, वर्धा, अमरावती, यवतमाळ, जालना, नाशिक, धुळे, जळगाव, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, बीड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर अशा अनेक जिल्ह्यात जिल्हापरिषद शाळा, खाजगी शाळा, बालवाडी, माध्यमिक शाळा, कॉलेज, सार्वजनिक मित्र मंडळे, बुद्ध विहारे, समाज मंदिरे, वाचनालय, चौकाचौकात, बाजारपेठेत, घरा घरात अशा अनेक ठिकाणी शिवजयंतीत क्रांतीसूर्य



महात्मा फुलेंनाही अभिवादन करण्यात आले. शाळा कॉलेजातून विद्यार्थ्यांना शिक्षकांनी व बाहेर इतरत्र या अभियानातील फुलेप्रेमी संविधान दुतांनी शिवजयंतीचा खरा आणि वास्तव इतिहास विद्यार्थी आणि नागरिकांना व्यवस्थित समजावून सांगितला.

रायगडावरची छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी महात्मा फुलेंनी शोधून काढली तसेच जगात पहिल्यांदा शिवजयंती उत्सव महात्मा फुलेंनी साजरा केला तर महात्मा फुले हे शिवजयंती उत्सवाचे जनक - प्रणेते ठरतात. हे आजवर अनेक विचारवंत, साहित्यिक, व्याख्याते यांनी पुस्तकातून लिहून ठेवले आहे, बोलले आहे पण ठोस पाऊल कुणीच उचलले नव्हते. त्यामुळे शिवजयंतीत क्रांतीसूर्य महात्मा फुलेंच्याहीउत्तुंग कार्यकर्तृत्वाला आणि स्मृतींना उजाळा देण्यासाठी हे घराघरात शिवजयंती मनामनात शिवजयंती हे अभियान विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशभर यशस्वीरित्या राबवले गेले. महाराष्ट्र, गोवा, गुजरात कर्नाटक, तेलंगणा, ऑस्ट्रेलिया, स्विडन, लंडन,दुबई येथूनही या अभियानास प्रचंड प्रतिसाद मिळाला.शिवजयंतीत महात्मा फुलेंना अभिवादन हे देशात पहिल्यांदाच घडले आहे, त्यानिमित्ताने एक ऐतिहासिक घटना घडली.एक सकारात्मक, जनजागृती, खरा आणि वास्तव इतिहास लोकाभिमुख करणारा प्रबोधन पर लोकचळवळ उभारणारा ऐतिहासिक पायंडा आज देशात पडला

===============

## चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , न्यू पनवेल ( स्वायत्त ) येथील तृतीय वर्ष , वाणिज्य ( लेखा व वित्त ) विद्यार्थ्यांची बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मध्ये लाईव्ह टर्मिनल- शैक्षणिक भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालया तर्फे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी तृतीय वर्ष , वाणिज्य (लेखा व वित्त) विद्यार्थ्यांची बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मध्ये लाईव्ह टर्मिनल अभ्यासा साठी, फिरोज जीजीभॉय टॉवर्स, दलाल स्ट्रीट , काळा घोडा, फोर्ट, मुंबई, येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. याचे नियोजन डॉ. निलेश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मनोज सुपेकर यांनी केले होते.या शैक्षणिक भेटीचे मूळ उद्दिष्ठ असे होते कि, विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि डेरिव्हेटिव्ह मार्केटमधील गुंतवणूक समजून घेता येईल, स्टॉक मार्केट ऑपरेशन, डेरिव्हेटिव्ह मार्केट आणि मूलभूत विश्लेषणाचे ज्ञान घेता येईल तसेच शेअर बाजारातील व्यापार कौशल्य समजून घेता येईल व स्टॉक मार्केटच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करता येईल.या शैक्षणिक भेटीसाठी विशेष मार्गदर्शक म्हणून बॉम्बे स्टॉक एक्सचेंज फोरमचे, वित्त आणि ऑपरेशन्सचे प्रमुख मा. युनूस कुरेशी लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि डेरिव्हेटिव्ह मार्केट याबद्दल सविस्तर माहिती दिली. या शैक्षणिक भेटीसाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. यामध्ये एकूण १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शीवला. हि शैक्षणिक भेट यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी लेखा व वित्त विभाग, प्रमुख प्रा. डॉ. निलेश कोळी, प्रा. मनोज सुपेकर, प्रा. अलोक भानुशाली आणि प्रा. मोनिका भालेराव यांनी विशेष परिश्रम घेतले.



## पोस्को महाराष्ट्र स्टीलने महिलांना दिली उद्योजक होण्याची संधी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी -सचिन पवार । माणगांव रायगड । माणगाव** :-शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या वतीने दहिवली परिसरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले, ज्यामध्ये अहिल्या महिला मंडळ, पेण येथे अभ्यासदौरा आणि नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात कापड वाटप समारंभ या दोन उपक्रमांचा समावेश होता. यामधून महिलांना उद्योगसंधी, स्वयंरोजगाराचे महत्त्व आणि आर्थिक सक्षमीकरण यांची माहिती देण्यात आली. दहिवली आणि परिसरातील पाच गावांतील १७ महिलांना अहिल्या महिला मंडळाच्या अभ्यासदौऱ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान महिलांना व्यवसाय विकास, उद्योजकतेच्या संधी आणि शाश्वत उपजीविकेच्या विविध पर्यायांबद्दल सखोल मार्गदर्शन मिळाले.या अभ्यासदौऱ्याचा मुख्य उद्देश महिलांना स्वयंरोजगार आणि लघुउद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने प्रेरणा देणे हा होता. “Seeing is believing” या तत्त्वावर आधारित या भेटीदरम्यान, महिलांना एक यशस्वी महिलांनी सुरु केलेला व्यवसाय प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. यामध्ये त्यांनी व्यवसायातील आव्हाने, संघटनात्मक कामकाज आणि नवीन उद्योजकीय संधी यांचा थेट अनुभव घेतला. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या प्रयत्नांमुळे या महिलांना




नव्या व्यवसाय संकल्पनांचा विचार करण्याची प्रेरणा मिळाली. अभ्यासदौऱ्याबरोबरच, पोस्को महाराष्ट्र स्टीलने दहिवली गावातील महिलांना नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात ३५०० मीटर कापडाचे वाटप केले. या कापडाचा उपयोग कापडी पिशव्या तयार करण्यासाठी केला जाईल. या उपक्रमामुळे महिलांना स्वयंरोजगार निर्माण करण्याची संधी मिळेल आणि पर्यावरणपूरक व्यवसायांना चालना मिळेल. यामुळे महिलांना आपला व्यवसाय सुरू करता येईल आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल उचलता येईल. हा कार्यक्रम १९ फेब्रुवारी रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी श्री. जी युन पार्क आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या संधीबद्दल महिलांनी उत्साह व्यक्त करत पोस्कोच्या या उपक्रमामुळे त्यांना उद्योजकतेच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. सहभागी महिलांनी व्यक्त केलेले काही अनुभव पुढीलप्रमाणे होते – “पोस्कोचा हा उपक्रम आम्हाला नवीन दिशा दाखवणारा आहे,” “या अभ्यासदौऱ्यात आम्हाला एका यशस्वी महिलांनी चालवलेल्या संस्थेचा अनुभव घेता आला,” तसेच “कापडाच्या मदतीने आम्हाला आमचा व्यवसाय सुरू करता येईल,” आणि “व्यवसाय सुरू करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर मात करण्याचे मार्ग शिकता आले.”पोस्को महाराष्ट्र स्टील नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते. ग्रामीण महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवणे आणि महिलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित करणे हे पोस्कोचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## मोटेभोम गावात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार

### उद्योजक घनश्याम पाटील यांचे शिवस्मारकासाठी योगदान

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या श्रद्धास्थानाचा इतिहास शिवप्रेमींबरोबरच समस्त तरुणाईला प्रेरणादायी ठरावा, यासाठी मोठेभोम ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून आणि उद्योजक घनश्याम केशव पाटील तसेच लोकप्रतिनिधी व दानशूरांच्या सहकार्याने उरण तालुक्यातील मोठेभोम गावाच्या प्रवेशद्वारा जवळच उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मेघडंबरी मधील आकर्षक तटबंदी असलेल्या सिंहासनारूढ शिवस्मारकाचे अनावरण काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी आमदार मनोहर भोईर, उद्योजक घनश्याम पाटील, संतोष ठाकूर, भास्कर मोकल, सचिन घबाडी तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते, शिवजयंतीचे औचित्य साधून, बुधवारदि.19 रोजी करण्यात आले.

यावेळी शिवाजी महाराजांना अभिवादन करीत मानाचा मुजरा करण्यात आला. हर हर महादेव जय भवानी, जय शिवराय असा जयघोष,भगवे झेंडे आणि ढोल ताशांचा गजर यामुळे पुन्हा एकदा इतिहास जिवंत झाला. हमरापुर (पेण) येथील शिल्पकार लहू ठाकूर यांनी हे शिवाजी महाराजांचे शिल्प साकारले आहे. विशेषता: सकाळी नऊ वाजता उद्योजक घनश्याम केशव पाटील व स्वराज पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अभिषेक सोहळा पार पडला. यावेळी शिवबा राजांच्या जन्मोत्सवाच्या पाळणा गीताचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिवबांची पालखी मिरवणूक आणि रात्री शिवव्याख्याते अँड. विवेक भोपी यांचे शिवव्याख्यान झाले. यावेळी चंद्रशेखर पाटील यांच्या मार्गदर्शनातून तयार करण्यात आलेल्या, मोठेभोम गावातील 35 कलाकारांनी देखाव्यातून शिवराज्याभिषेकाचा प्रसंग सादर केला. शिवस्मारकात मावळे, हत्ती, तोफा अशी शिल्पे उभारण्यात आली असून, गावात शिवसृष्टी निर्माण झाली आहे. त्यामुळे मोठेभोम गावाच्या सौंदर्यात भर पडली आहे.





दैनिक युवक आधार

आदर्श जेष्ठ नागरिक सन्मान हस्ते सौ संगिताताई आमले चेअरमन अंकिता समुह महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवाजी महाराज जयंती व श्रीसत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले जिल्हाध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांच्या वतीने विभागातील 90 वर्षाचे जेष्ठ हभप श्री आत्माराम सरफरे बाबा यांचा अंकिता समुहांच्या चेअरमन मा सौ संगिताताई दिलीप आमले उपजिल्हाप्रमुख शिवसेना नवी मुंबई सौ संगिता दाते श्री अजय सरफरे यांच्यासह अनेक जेष्ठ नागरिक विशेष सन्मानपूर्वक गौरव करतेत आला विभागातील अनेक भाविकांनी अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल येथे दर्शनाचा लाभ घेतला

## नेवासा भूमीअभिलेख कार्यालयावर व्यापाऱ्यांचा धडक मोर्चा चुकीची मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यावर निलंबणाची मागणी

दैनिक युवक आधार

**नेवासा प्रतिनिधी**

**लखन वाल्हेकर** : मुकिंदपूर हद्दीतील पाटबंधारे विभागाच्या चारिवरील अतिक्रमण काढण्यासाठी केलेल्या चुकीच्या मोजणी विरोधात आज काँग्रेसच्या नेतृत्वाखाली येथील व्यापाऱ्यांनी आज भूमीअभिलेख कार्यालयावर मोर्चा काढत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. सविस्तर वृत्त असे की, मुकिंदपूर हद्दीतून डीवाय तीन पासून पावन गणपती पर्यंत सबमायनर दोन ही पोटचारी जाते.गेल्या वीस वर्षांपासून ही चारी बंद अवस्थेत असल्यामुळे या चारिवर स्थानिक लोकांकडून अतिक्रमण झाले. हे अतिक्रमण काढण्याची मागणी झाल्यामुळे पाटबंधारे विभागाकडून या चारीवरील अतिक्रमण काढण्यासाठी हालचालीस जोरात सुरुवात करण्यात आली. भूमी अभिलेख कार्यालयाकडून या चारीची हद्द मोजणीची प्रक्रिया सुरुवात करण्यात आली. परंतु ही मोजणी करताना मूळ अधिग्रहण केलेल्या नकाशानुसार न करता मूळ चारीची हद्द बदलून करण्यात आली त्यामुळे याअगोदर करण्यात आलेल्या मोजणी पेक्षा वेगळी मार्किंग करण्यात आली त्यामुळे सर्वच व्यापाऱ्यांना या अतिक्रमनात ओढण्यात आले. त्यामुळे येथील व्यापारी वर्गात मोठा असंतोष निर्माण झाला. चुकीच्या केलेल्या





मोजणीच्या विरोधात भूमी अभिलेख अधिकाऱ्याच्या विरोधात सर्व व्यापाऱ्यांनी एकत्र येत नेवासा काँग्रेसचे अंजुम पटेल, प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या नेतृत्वाखाली नेवासा फाटा येथील भूमीअभिलेख कार्यालयावर धडक मोर्चा काढला व दिवसभर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी भूमी अभिलेख कार्यालयच्या कारभारावर आक्षेप घेत आर्थिक तडजोडी करून ह्या चुकीच्या मोजणीचा घाट घालण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. यावेळी प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी काँग्रेस पक्ष हा व्यापाऱ्यांनाच्या पाठीशी ठाम उभा असून एकाही व्यापाऱ्यां वर अन्याय होऊ देणार नाही असे स्पष्ट केले. अंजुम पटेल यांनी चुकीची मोजणी करण्यामागे आर्थिक तडजोड हेच कारण असून चुकीची मोजणी करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी याना निलंबित केलेच पाहिजे या भ्रष्ट अधिकाऱ्यांना धडा शिकविणार. तर महिला काँग्रेसच्या शोभा पातारे यांनी सरकारला धारेवर धरत निवडणुकीत यांना मतदान केल्याचे हे बक्षीस व्यापाऱ्यांना या सरकारने दिले आहे हेच भाजपने दिलेले अच्छे दिन आहेत असा घनाघात केला. यावेळी पाटबंधारेचे उपभियंता अक्षय कराळे व भूमी अभिलेख अधिकारी यांनी उपस्थित आंदोलनास संबोधित करत नव्याने मोजणी करून नियमामधेच मार्किंग केली जाईल व कुठल्याही प्रकारे नियमबाह्य अतिक्रमण काढले जाणार नाही याची हमी दिली. यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी जिल्हा काँग्रेसचे संदीप मोटे,आपचे प्रवीण तिरोडकर, आयन पिंजारी, बादल परदेशीं, सचिन गायकवाड, हरी दुकळे, भैय्या पटेल, शरीफ शेख, गुलाब पठाण, संतोष ससाणे, विकास गवळी, महादेव नंनवरे, जब्बर शेख, शाहरुख कुरेशी, सादिक शेख आदी सह असंख्य व्यापारी उपस्थित होते.

## एस टी अलिबाग अगार प्रमुखांनी अनुभवले प्रवाशांप्रमाणे ऊन्हाचे चटके –देवव्रत पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा अलिबाग एसटी आगार प्रमुखांना उन्हाचा तडाखा

दैनिक युवक आधार

**निलेश फुंडे रेवदंडा** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मा. श्री देवव्रत विष्णू पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य. दिनांक १८ फेब्रुवारी रोजी अलिबागच्या ST अगारात गेल असता भर दुपारच्या 12:30 वाजता वावे,रामराज, सुडकोली, रोहा ईत्यादी मार्गावरील प्रवास्यांच्या एस टी ची प्रतीक्षा करत रांगेत ऊभे होते. या रांगामध्ये मोठ्या प्रमाणात वृद्ध, महिला व विद्यार्थी होते. ऊन्हात– पावसात याप्रकारे नेहमीच रांगा असतात, पण त्याची दखल एस टी प्रशासन काही घेत नाही. जनता मालक आहे या देशाची पण त्याची जाणिव नसल्याने विनाकारण आपल्या नोकरांकडून त्रास सहन करत असते. प्रवासी ऊन्हात असल्याची परिस्थिती पाहिल्यावर देवव्रत पाटील यांनी अलिबाग आगार प्रमुख श्री देवरे यांना सदर रांगांन मधिल प्रवासीच्या संवेदना कळण्यासाठी त्या ठिकाणी आणले. त्यावेळी प्रवास्यांनी आपली



कैफियत मांडत गेले दिड – दोन तास गाडीची वाट पाहत ऊभे असल्याचे ऊभयतांना सांगितले. या विलंबाचा जाब साहेबांना विचारला, त्यावेळी तात्काळ रामराज व रोहा येथे जाण्यासाठी दोन गाड्यांची व्यवस्था करण्यात आली. अलिबाग आगारात प्रवासी ऊन– पावसात गाडीची वाट पाहत तात्काळत ऊभे असतात त्यांना शेडमध्ये रांगेत ऊभे राहण्यासाठी व्यवस्था करण्याविषयीचे मागणी पत्र देवव्रत पाटीलां कडून देण्यात आलंय. त्याविषयी आगाराचं नुतनी करण करणार असल्यामुळे सध्या ती व्यवस्था करू शकत नसल्याचे सांगण्यात आलंय. तसेच संध्याकाळी रेवदंडा,मुरुड, कडे जाणाऱ्या गाड्या रायगड बाजार स्टॉप वर थांबवत नाहीत, एस टी बस थांबली तरी कंडक्टर डबल बेल मारतो अस का ? याची प्रवाशांमध्ये जोरदार चर्चा असल्याचे ही देवव्रत पाटील यांनी सांगितले. जनतेनी आपल्या समस्या बद्दल आपली व्यथा आमच्याकडे सांगितली तर नक्किच त्याबद्दल प्रशासनाला जाब विचारून समस्यांचं निराकरण करण्याचं प्रयत्न करू असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे श्री देवव्रत पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य यांनी सांगितले

## नळदुर्ग येथे छत्रपती शिवरायांचा आश्वारूढ पुतळा उभारण्यात यावे पालकमंत्र्यांकडे मागणी

दैनिक युवक आधार

**संतोष पुदाले । तुळजापूर धाराशिव** : नळदुर्ग हे एक ऐतिहासिक किल्ला नळदुर्ग शहर म्हणून धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जातो दरवर्षी लाखो पर्यटक व भाविक शहरात किल्ला पाहण्यासाठी व खंडोबा देवदर्शनाला येतात शहराला दोन राष्ट्रीय महामार्ग लाभले असून शहरात परिसरातील ६० गावचा कामानिमित्त रोजचा संपर्क आहे अशा या ऐतिहासिक शहरात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्रारूढ पुतळा उभारावा अशी मागणी शिवप्रेमी नागरिकाची अनेक वर्षापासून आहे व तसेच नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयास छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय अशी नामकरण करण्यात यावे हि मागणी शिवभक्तांनी केली आहे तसेच नळदुर्ग येथे बसडेपोची सुधा मागणी करण्यात आले आहे दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त शहरात अनेक ठिकाणी पूजन झाले त्या प्रत्येक ठिकाणी ही भावना शिवप्रेमी व्यक्त केली आहे त्याच अनुषंगाने समस्त नळदुर्ग शहर वासियांच्या वतीने सर्वपक्षीय नेते एकत्र येऊन उपजिल्हा रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे आले असताना त्यांना ही मागणीचे निवेदन देण्यात आले यावेळी माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण माजी उपनगराध्यक्ष शहबाज काझी उदय जगदाळे इमाम शेख बसवराज धरणे विनायक अहंकारी शफी शेख सुधीर हजारे भाजपचे सुशांत भूमकर नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले मनसेचे शहराध्यक्ष प्रमोद कुलकर्णी दत्तात्रय कोरे सरदार सिंग ठाकूर जेष्ठ पत्रकार विलास येडगे शाशिकांत पुदाले विनायक पुदाले संजय जाधव उमेश नाईक सामाजिक कार्यकर्त्या सुभद्राताई मुळे कल्पनाताई गायकवाड व सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते



## कौटुंबिक व्यवस्थेत महाशक्तीची भूमिका महत्वाची धनंजयजी धामणे

दैनिक युवक आधार

**सेलू प्रतिनिधी । महेश राऊत** : भारतीय कुटुंब व्यवस्थेत सांस्कृतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार रुजविण्यात मातृशक्तीची भूमिका महत्वाची ठरल्याने भारतीय कुटुंब व्यवस्था जगाच्या तुलनेत आजपावेतो टिकून आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या देवगिरी प्रांताचे कार्यवाह धनंजय धामणे यांनी येथील एका व्याख्यानात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीनगरच्या देवगिरी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर हे होते.तर व्यासपीठावर परभणी जिल्हा संघचालक मुकुंद चौधरी,उपेंद्र बेल्लूरकर,हरिभाऊ चौधरी यांची उपस्थिती होती. सेलूतील नूतन विद्यालयाच्या रा.ब.गिल्डा सभागृहात दिनांक.२० फेब्रुवारी रोजी कै.जनुभाऊ रानडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या विवेकानंद संस्कार केंद्राच्या वतीने ' कुटुंब प्रबोधन काळाची गरज ' या विषयावर आयोजित व्याख्यानात श्री.धामणे यांनी वरील प्रतिपादन केले.ते पुढे म्हणाले की,वर्तमान काळात भारतीय कुटुंब व्यवस्थेवर पाश्चात्य संस्कृतीचे आक्रमण होत असून ते रोखण्यासाठी कुटुंब संस्थेचा मूळ आधार असलेल्या मातृशक्तीसह कर्ता पुरूष व पाल्यांचे प्रबोधन होण्याची गरज आहे.

**जीवन शैलीचे जतन**

–भारतीय जीवन पध्दतीत सांस्कृतिक व अध्यात्मिक संस्कार रुजविण्यासाठी योग्य वयात विवाह संस्कार झाले पाहिजेत.





आपले निवास,आहार विहार,स्वदेशी वस्तूंचा वापर, वेशभूषा,मातृभाषेतून शिक्षण व व्यवहार आणि इंग्रजी भाषेतील शिक्षणाच्या दुराग्रहावर नियंत्रण, योग-प्राणायाम,ध्यान, पर्यावरण संवर्धन व रक्षण,स्वच्छता, अर्थार्जनाचा सुयोग्य विनियोग व वापर,काटकसर व बचतीचे महत्त्व आदि कुटुंब व्यवस्थेशी निगडित विविध पैलूंवर उपस्थित श्रोत्यांना विस्ताराने मार्गदर्शन करत भावी पिढी सुसंस्कारित, सुदृढ ,राष्ट्र आणि समाजनिष्ठ झाली पाहिजे असे ते म्हणाले. व्याख्यान मालेच्या या कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता ,अहिल्यादेवी होळकर ,विवेकानंद व स्व.जनुभाऊ रानडे यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपेंद्र बेल्लूरकर यांनी व्याख्यानमालेच्या आयोजनाचे व समाजप्रबोधाचे महत्व विशद केले .भगवानसिंग राठोड यांनी वसुंधरा परिवार हमारा ' हे औचित्यपूर्ण पद्य सादर केले. अध्यक्षीय समारोपात प्रविण नांदेडकर यांनी स्व.जनुभाऊ रानडे यांच्या ऋषितुल्य व समर्पित जीवनाचा परिचय देत संघाच्या कार्यात नवी राष्ट्रनिष्ठ तरूण पिढी व कुटुंबाचा संघकार्यात सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. कार्यक्रमाचे संचालन विजय चौधरी यांनी कले विश्वास देव यांनी आभार मानले.शेवटी सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.व्याख्यानास सेलूतील सर्व स्तरातून मोठा महिलावर्ग व श्रोते उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवगिरी बँकेचे, जनसेवा पतसंस्था सेलू, जनकल्याण पतसंस्था म.परभणी यांचे अधिकारी,कर्मचारी तसेच विवेकानंद संकुलाचे शिक्षक,शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## हिंदी मराठी पत्रकार संघ कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन





दैनिक युवक आधार

**संपादक संतोष आमले** : हिंदी मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सुद्धा सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र अध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील यांनी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजकारण आणि समाजकारणातील आदर्श गुण प्रत्येकाने अंगीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. तर छत्रपती शिवरायांची राजनीती, दूरदृष्टी आणि संघटन कौशल्य हे उच्च कोटीचे असल्याचे अजय टप यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाला धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र अध्यक्ष, अजय टप, श्रीकृष्ण तायडे, सतीश दांडगे, प्रा. प्रकाश थाटे, बळीराम बावस्कार, शालिग्राम पाटील ,नथुजी हिवराळे , विनायक तळेकर, शेख निसार, मयूर लड्डा, प्रदीप इंगळे, प्रणव पाटील, आरुष मेतकर उपस्थित होते

## शिवरायांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांचे आचार विचार आपल्या मस्तकात भिनवणे आवश्यक आहे, डॉ .सीमा डेर्ले

दैनिक युवक आधार

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक । विनोद गायकवाड । निफाड** :- शिवरायांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांचे आचार विचार आपल्या पुस्तकात विनवणे आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉक्टर सीमा डेरले यांनी केले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळ व कला वाणिज्य महाविद्यालय इगतपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानविज्ञान वाचन चळवळ सप्ताह सपन्न झाला त्यात, शिवचरित्रातून आज आपण काय शिकावे? या विषयावर तिसरे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या, श्रीमान योगी या ग्रंथाच्या आधारे शिवराय हे उत्कृष्ट योध्दा, कुशल प्रशासक, प्रजाहितदक्ष असे रयतेचे राजे होते. मध्ययुगीन कालखंडात जाती व्यवस्था अतिशय कडक रितीने समाजात पाळली जात असे, परंतु शिवाजी महाराजांची भूमिका ही जातीव्यवस्थेला व वर्णव्यवस्थेला छेद देणारी होती. स्त्रियांच्या अब्रुला धक्का लागता कामा नये मग ती परकी असो वा शत्रूची स्त्री चा सन्मान कायम राहिला पाहिजे असा त्यांचा दृष्टीकोन होता, हे त्यांनी कल्याणच्या सुभेदाराची सून व रांझा गावच्या पाटलाचे उदाहरण देऊन पटवून दिले. शिवरायांचा प्रेरणा देणारा हा वेगळा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोचायला हवा. शिवाजी महाराजांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांच्ये आचार, विचार आपल्या मस्तकात भिनवणे आवश्यक आहे असेआवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

या वेळी डॉ. प्रतिभा जाधव, नवनाथ वाघचौरे, डॉ.सीमा डेर्ले या ग्रंथ अन्वेषकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. व्याख्यानमालेचे प्रास्तविक बहिःशाल शिक्षण मंडळाचे केंद्र कार्यवाह प्रा.के व्ही दुनबळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रतिभा हिरे यांनी मार्गदर्शनपर विचार मांडले. व्याख्यानमालेसाठी समन्वयक प्रा.शशिकांत सांगळे, प्रा.अविनाश कासार, प्रा. ललिता अहिरे यांचे सहकार्य लाभले.



## मराठा वेशभूषा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक युवक आधार

**पनवेल(प्रतिनिधी)** : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंती शोभायात्रा निमित्त भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १९ च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठा वेशभूषा स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हि स्पर्धा १५ वर्षांखालील मुलामुलींसाठी होती. या स्पर्धेत ५० हुन अधिकांनी सहभाग घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमुळे भावी युवा पिढीमध्ये इतिहासाची जागृती आणि मराठा संस्कृती अधोरेखित झाली. स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हा मराठा वेशभूषेप्रती असलेल्या आकर्षणाचे आणि अभिमानाचा प्रतीक ठरला.

या स्पर्धेला प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, प्रशांत शेट्ये, चिन्मय समेळ, कोमल कोळी यांच्यासह अनेक शिवप्रेमींची उपस्थिती लाभली.मराठा वेशभूषा ही मराठा साम्राज्यातील पारंपरिक पोशाख आणि परंपरांचे प्रतीक आहे. पुरुष आणि स्त्रिया दोघांचीही वेशभूषा त्याकाळच्या संस्कृती, सामाजिक स्थान, आणि युद्ध परंपरानुसार ठरलेली होती. मराठा वेशभूषा ही केवळ सौंदर्यदर्शक नव्हती, तर ती त्यांच्या जीवनशैली, पराक्रम आणि संस्कृतीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. त्या अनुषंगाने मराठा वेशभूषा स्पर्धा हा पारंपरिकतेचा आणि मराठा संस्कृतीचा गौरव करणारा विशेष उपक्रम ठरला आहे. या स्पर्धेत स्पर्धकांनी पारंपरिक मराठा पोशाख परिधान करून इतिहासातील विविध व्यक्तिरेखांचे सादरीकरण केले. १५ वर्षाखालील मुलामुलींनी आपल्या सुप्तगुणांचे दर्शन घडवत शिवजयंतीचा उत्सव उत्साहात साजरा केला. त्यानुसार या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, चषक आणि प्रमाणपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## गुरे चोरी करणाऱ्या सराईत टोळीला पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

दैनिक युवक आधार

**पनवेल, वार्ताहर** : पनवेल तालुका परिसरात गुरे चोरी करणाऱ्या सराईत टोळीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केल्याने त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पनवेल, उरणसह इतर विभागातील गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळाले आहे.

पनवेल तालुक्यात राहणारे अभिदास गायकर यांच्या घरासमोर बांधून ठेवलेले दोन बैल अज्ञात इसमांनी फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करुन नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच प्रस्तूत गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपीच्या वर्णनाव्यतिरिक्त इतर कोणताही धागादोरा नसतांना वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अनुरुध्द गिजे, पोउपनि. हर्षल राजपुत व गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरु केला. तांत्रीक तपासावरुन तसेच उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज चे आधारे यातील आरोपी सलमान उर्फ राजा करीम शेख, वय 25 वर्षे (रा.तळोजा) व तारीक यासीन कुरेशी, वय 23 वर्षे (रा. कौसा, मुंब्रा) येथून ताब्यात घेवून त्यांचेकडे केलेल्या तपासामध्ये तसेच तांत्रीक तपासामध्ये इतर पाहिजे आरोपीत हे जिल्हा नांदेड येथे असल्याची माहिती प्राप्त



आरोपींसह पनवेल तालुका पोलिसांचे पथक

झाल्याने सपोनि गिजे व तपास पथकाने नांदेड येथे जावून आरोपी फरहान हनीफ बुबेरे, वय 25 वर्षे (रा.तळोजा) तसेच उवेष उर्फ ओवेस शकील कुरेशी, वय 19 वर्षे (निजामपुरा, भिवंडी) यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर टोळीने यापुर्वी पनवेल व उरण परिसरात अशा प्रकारचे गंभीर गुन्हे केल्याची स्वखुशीने कबुली दिली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तळोजा पोलीस ठाणे, उरण पोलीस ठाणे, रोहा पोलीस ठाणे, विष्णूनगर पोलीस ठाणे डोंबिवली, पोयनाड पोलीस ठाणे, बाजारपेठ पोलीस ठाणे कल्याण, खालापूर पोलीस ठाणे, पेण पोलीस ठाणे, नागोठणे, डायघर पोलीस ठाणे आदी ठिकाणी त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 2, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपुत यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व दिलेल्या सुचनांमुळे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा–या टोळीचा बिमोड करण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विकास साळवी, सोमनाथ रणदिवे, विजय देवरे, महेश धुमाळ, सुनिल कुदळे, सतिश तांडेल, शिवाजी बाबर, वैभव शिंदे, पोशि राजकुमार सोनकांबळे, आकाश भगत, विद्या गायकवाड, भिमराव खताळ यांनी पार पाडलेली आहे.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली-गुणवंत एच.मिसलवाड



दैनिक युवक आधार

**नांदेड** : आठराव्या शतकात 6 जानेवारी 1832 रोजी पहिले मराठी वृत्तपत्र दर्पणची स्थापना करून त्या काळी सामाजिक प्रश्नासाठी निर्भीडपणे लेखणीच्या माध्यमातून प्रहार करून वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवणारे आद्य पत्रकार म्हणजे आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे होत, असे प्रतिपादन एस.टी. मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.20 फेब्रुवारी 2025 गुरूवार रोजी सकाळी ठिक 10.30 वाजता आद्य मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक तथा थोर साहित्य संपादक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची 213 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, बाळशास्त्री जांभेकर यांनी महिला सबलीकरण, अंधविश्वास दूर करणे, महिलांना शिक्षण, अज्ञान दूर करणे अशा अनेक विषयासाठी दर्पणच्या माध्यमातून जनतेमध्ये जागरूकता निर्माण केली आहे. पत्रकार हा प्रशासक व समाज यामधील दुवा असून जनतेचा तो आरसा आहे. हल्ली पत्रकारांवर वास्तव लिखाणाबद्दल हल्ले होतात, ही गंभीर बाब असून सरकारने पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी. पत्रकारांनी वृत्तांकन करतांना सजग राहणेही गरजेचे असून हल्लीच्या जमाण्यात आपण सर्वांनीच वाचन संस्कृती (वाचाल तर वाचाल) वाढविणे ही काळाची गरज आहे, असेही ते शेवटी म्हणाले.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मा.श्री.अनिकेत बल्लाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक श्रीनिवास रेणके, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, सौ.पायल बैस, सुनिता हुंबे, श्वेता तेलेवार, वैष्णवी गंदेवार, प्रियंका खरात, कृष्णा पवार, संजय मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म.आगारातील कामगार कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.